**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२१ – २२

### मराठी विभाग : मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

लोकमत

## भाषा ही जगण्याची मूलभूत गरज : डॉ. संजय नगरकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर** : अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या प्राथमिक गरजांसोबत भाषा ही माणसाच्या जगण्याची मूलभूत गरज असल्याचे प्रतिपादन कर्जत, जि. अहमदनगर येथील दादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी भाषासंवर्धन पंधरवडानिमित्तच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नगरकर बोलत होते. याप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. संदीप सांगळे, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. प्रतीक्षा खराडे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

नगरकर म्हणाले, कोरोना काळात साहित्य, संगीत, कला यांचे सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित केले. कोरोनामुळे मराठी माणसाच्या तोंडी अनेक नवीन संज्ञा सहज रुळल्या असून त्या शब्दांना पर्यायी नवे मराठी शब्द सुचवणे व ते वापरात आणणे आवश्यक असल्याचे सांगन मराठी भाषा पंधरवडा साजरा केल्याचे ते सार्थक ठरेल.

अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. संदीप सांगळे म्हणाले, मराठी विषयाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमात विद्यापीठाने कौशल्याधिष्ठित घटकांचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांनी विविध भाषिक व व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी आपल्या मातृभाषेचा आधार घेतल्यास मराठी भाषा आणि साहित्याला निश्चित वैभव प्राप्त होईल. माय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होण्यासाठी राज्यकर्त्यांनी इच्छाशक्ती दाखवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.



प्राचार्य डॉ. संजय नगरकर व डॉ. संदीप सांगळे यांचे स्वागत.

Hello Pune Gramin
Page No. 2 Jan 10, 2022
Powered by: erelego.com



मराठी विभागातील साहित्यिक प्रेरणाक्षरांच्या तक्त्यात स्वाक्षरी करताना डॉ. संदीप सांगळे.

# भाषा ही जगण्याची गरज

## प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांचे मत

**राजगुरूनगर : पुढारी वृत्तसेवा**

अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या प्राथमिक गरजांसोबत भाषा ही माणसाच्या जगण्याची मूलभूत गरज असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांनी केले.

मराठी भाषासंवर्धन पंधरवडानिमित्त हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. संदीप सांगळे, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. प्रतीक्षा खराडे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

डॉ. संजय नगरकर म्हणाले, कोरोना काळात साहित्य, संगीत, कला यांचे सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित केले. कोरोनामुळे मराठी माणसाच्या तोंडी अनेक नवीन संज्ञा सहज रूळल्या. या शब्दांना पर्यायी नवे मराठी शब्द सुचवणे व ते वापरात आणणे आवश्यक आहे.

डॉ. संदीप सांगळे यांनी मराठी विषयाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमात विद्यापीठाने कौशल्याधिष्ठित घटकांचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांनी विविध भाषिक व व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी आपल्या मातृभाषेचा आधार घेतल्यास मराठी भाषा आणि साहित्याला निश्चित वैभव प्राप्त होईल, असे सांगितले.

प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले. आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

My Gramin Edition
Jan 11, 2022 Page No. 9
newspaper.pudhari.co.in

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

# भाषा ही जगण्याची मूलभूत गरज : डॉ. संजय नगरकर

राजगुरुनगर (दै. संध्या) :

■ मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उपक्रम



अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या प्राथमिक गरजांसोबत भाषा ही माणसाच्या जगण्याची मूलभूत गरज असल्याचे प्रतिपादन कर्जत (जि. अहमदनगर) येथील दादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांनी येथे केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी भाषासंवर्धन पंधरवडानिमित्तच्या कार्यक्रमात बोलत होते.

याप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. संदीप सांगळे, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. प्रतिक्षा खराडे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना डॉ संजय नगरकर यांनी कोरोना काळात साहित्य, संगीत, कला यांचे सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित केले. कोरोनामुळे मराठी माणसाच्या तोंडी अनेक नवीन संज्ञा सहज रूळल्या असून त्या शब्दांना पर्यायी नवे मराठी शब्द सुचवणे व ते वापरात आणणे आवश्यक असल्याचे सांगून मराठी भाषा पंधरवडा साजरा केल्याचे ते सार्थक ठरेल असे म्हणाले. अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. संदीप सांगळे यांनी सांगितले की, मराठी विषयाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमात विद्यापीठाने कौशल्याधिष्ठित घटकांचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांनी विविध भाषिक व व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी आपल्या मातृभाषेचा आधार घेतल्यास मराठी भाषा आणि साहित्याला निश्चित वैभव प्राप्त होईल. माय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होण्यासाठी राज्यकर्त्यांनी इच्छाशक्ती दाखवावी, अशी अपेक्षा व्यक्त करून मराठी विभाग राबवित असलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. संजय शिंदे यांनी केले. आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

HRMJ

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
गांवकरी



# भाषा ही जगण्याची मूलभूत गरज : डॉ संजय नगरकर

राजगुरुनगर (गांवकरी प्रतिनिधी) :

अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या प्राथमिक गरजांसोबत भाषा ही माणसाच्या जगण्याची मूलभूत गरज असल्याचे प्रतिपादन कर्जत (जि. अहमदनगर) येथील दादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांनी येथे केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी भाषासंवर्धन पंधरवडानिमित्तच्या कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. संदीप सांगळे, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. प्रतिक्षा खराडे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना डॉ संजय नगरकर यांनी कोरोना काळात साहित्य, संगीत, कला यांचे सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित केले. कोरोनामुळे मराठी माणसाच्या तोंडी अनेक नवीन संज्ञा सहज रूळल्या असून त्या शब्दांना पर्यायी नवे मराठी शब्द सुचवणे व ते वापरात आणणे आवश्यक असल्याचे सांगून मराठी भाषा पंधरवडा साजरा केल्याचे ते सार्थक ठरेल असे म्हणाले. अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. संदीप सांगळे यांनी सांगितले की, मराठी विषयाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमात विद्यापीठाने कौशल्याधिष्ठित घटकांचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांनी विविध भाषिक व व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी आपल्या मातृभाषेचा आधार घेतल्यास मराठी भाषा आणि साहित्याला निश्चित वैभव प्राप्त होईल. माय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होण्यासाठी राज्यकर्त्यांनी इच्छाशक्ती दाखवावी, अशी अपेक्षा व्यक्त करून मराठी विभाग राबवित असलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले.

पुणे आवृत्ती बातम्यांचा राजा
जनप्रवास
मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, अहमदनगर येथून एकाच वेळी प्रसिध्द RNI No. MAHMAR/2013/57952

# भाषा ही जगण्याची मूलभूत गरज : डॉ संजय नगरकर

## मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उपक्रम



**राजगुरुनगर**
**जनप्रवास प्रतिनिधी**

अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या प्राथमिक गरजांसोबत भाषा ही माणसाच्या जगण्याची मूलभूत गरज असल्याचे प्रतिपादन कर्जत (जि. अहमदनगर) येथील दादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांनी येथे केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी भाषासंवर्धन पंधरवडानिमित्तच्या कार्यक्रमात बोलत होते.

यាप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. संदीप सांगळे, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. प्रतिक्षा खराडे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना डॉ संजय नगरकर यांनी कोरोना काळात साहित्य, संगीत, कला यांचे सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित केले. कोरोनामुळे मराठी माणसाच्या तोंडी अनेक नवीन संज्ञा सहज रूळल्या असून त्या शब्दांना पर्यायी नवे मराठी शब्द सुचवणे व ते वापरात आणणे आवश्यक असल्याचे सांगून मराठी भाषा पंधरवडा साजरा केल्याचे ते सार्थक ठरेल असे म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. संजय शिंदे यांनी केले. आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

वर्ष : १४१
केसरी
राष्ट्रीय ठेवा

# राजगुरुनगर महाविद्यालयात मराठी भाषा कार्यक्रम

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या प्राथमिक गरजांसोबत भाषा ही माणसाच्या जगण्याची मूलभूत गरज असल्याचे प्रतिपादन कर्जत (जि. अहमदनगर) येथील दादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांनी येथे केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी भाषासंवर्धन पंधरवडानिमित्तच्या कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. संदीप सांगळे, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. प्रतिक्षा खराडे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. संदीप सांगळे यांनी सांगितले की, मराठी विषयाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमात विद्यापीठाने कौशल्याधिष्ठित घटकांचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांनी विविध भाषिक व व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी आपल्या मातृभाषेचा आधार घेतल्यास मराठी भाषा आणि साहित्याला निश्चित वैभव प्राप्त होईल.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**